# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक क्र.922/२०२२

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांचा शासन निर्णय क्र. Misc-2018/C.R.56/18/UNI-1 दि. ०८ मार्च, २०१९ तसेच महाराष्ट्र शासनाचे शुध्दीपत्रक क्र. Misc-2018/C.R.56/18/UNI-1, दि. १० मे, २०१९ रोजी निर्गमित केलेल्या शुध्दीपत्रकातील मुद्दा क्र. ६.१ (V) व (VI) मध्ये इतर महाविद्यालयांप्रमाणेच अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त असलेल्या महाविद्यालयांकरिता प्राचार्य/अध्यापकांची निवड तसेच नियुक्तीबाबत निवड समितीची तरतूद केलेली आहे.

परंतु, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३० (१) नुसार अल्पसंख्यांक असलेल्या सर्व वर्गांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा मुलभूत हक्क आहे. भारतीय संविधानाच्या सदर अनुच्छेदाचे मा. सर्वोच्च न्यायालयाने तसेच मा. उच्च न्यायालयांनी त्यांच्या विविध निर्णयांमध्ये वेळोवेळी विश्लेषण केले आहे व अल्पसंख्यांक संस्थांच्या प्रशासन करण्याच्या अधिकारामध्ये हस्तक्षेप केल्यास ते भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३० (१) उल्लंघन ठरते असे नमूद केले आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने तसेच मा. उच्च न्यायालयांनी त्यांच्या निर्णयांमध्ये, अध्यापकांची निवड आणि नियुक्ती हा प्रशासनाचा भाग असून, अल्पसंख्यांक संस्थांनी नियमानुसार विहित प्रक्रियेचा अवलंब करून अध्यापकांची निवड तसेच नियुक्ती केली असल्यास त्यामध्ये राज्य सरकार किंवा विद्यापीठ हस्तक्षेप करू शकत नाही, असे स्पष्ट केले आहे. मा. मद्रास उच्च न्यायालयामध्ये दाखल फोरम ऑफ मायनॉरिटी इन्स्टिटयूशन्स अॅण्ड असोसिएशन विरूध्द स्टेट ऑफ तामिळनाडू या याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. ०५/०१/२०११ च्या आदेशान्वये विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेले निवड समितीच्या रचनेसंदर्भातील विनियम अल्पसंख्यांक संस्थांना लागू होत नसल्याबाबतचा निर्णय दिलेला आहे.

या परिपत्रकाद्वारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व अल्पसंख्यांक महाविद्यालये/संस्था यांना प्राप्त आदेशानुसार कळविण्यात येते की, राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग, मा. सर्वोच्च न्यायालय तसेच मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७. )
जावक क्र. सीसीओ/ 1550 )
दि. 17/05/2022 )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव
शैक्षणिक विभाग (शिक्षक मान्यता कक्ष)

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित अल्पसंख्यांक महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था
पुणे/अहमदनगर/नाशिक